26 JUL 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘स्मृतितरंग’ च्या माध्यमातून संशोधनास चालना

## प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन: देशविदेशात संशोधक कार्यरत



कोल्हापूर : डॉ. आर. व्ही. भोसले यांच्या जीवनावर आधारित पी. टी. पाटील लिखित ‘स्मृतितरंग‘ पुस्तकाचे प्रकाशन करताना प्र–कुलगुरू डॉ. शिर्के. सोबत डॉ. भोसले, विजया भोसले, अरुण नरके, डॉ. पी. एस. पाटील आदी.

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

डॉ. आर. व्ही. भोसले यांनी १९६० मध्ये परदेशात जावून स्पेस सायन्स या विषयावर संशोधन केलेले संशोधन जगभरातील संशोधकांना प्रेरणा देणारे आहे. पन्हाळा येथे त्यांच्या प्रयत्नामुळेच अवकाश संशोधन केंद्राची स्थापना झाली आहे. त्यांच्या जीवनावर आधारित पी. टी. पाटील यांनी ‘स्मृतितरंग“ चरित्रात्मक हे पुस्तक लिहिले असून या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांना संशोधनासाठी चालना मिळेल, असे प्रतिपादन प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

साईक्स एक्सटेंशन येथील महालक्ष्मी सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमाला इंडियन डेअरी असोसिएशनचे माजी अध्यक्ष अरुण नरके, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. आर.व्ही. भोसले, विजया भोसले, मराठी विज्ञान परिषदेचे जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव पवार,विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.


प्र–कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. भोसले यांनी केलेल्या संशोधनाचा फायदा आपल्या जन्मभूमीतील विद्यार्थ्यांना मिळावा म्हणून सतत प्रयत्न केले. मायदेशी परतल्यानंतर त्यांनी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागात स्पेस सायन्स विषयाचा अभ्यासक्रम तयार केला. गेल्या २८ वर्षापासून ते विनामूल्य मार्गदर्शन करत आहेत. राजाराम कॉलेजमध्ये पदवी अभ्यासक्रमात स्पेस सायन्स विषय तयार केला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक संशोधक विद्यार्थी तयार झाले असून ते आज देश–विदेशात संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. डॉ. भोसले यांच्यामुळेच विद्यापीठाचा इस्त्रोबरोबर करार करण्यात आला. संशोधन क्षेत्रातील कार्याबद्दल त्यांना पद्मश्री व पद्मविभूषण मिळण्यासाठी शिवाजी विद्यापीठ पाठपुरावा करेन. डॉ. आर.व्ही. भोसले म्हणाले, कॅनडा येथे संशोधन करताना जेवढा आनंद झाला, तेवढाच आनंद पन्हाळा येथील अवकाश संशोधन स्थापनेवेळी झाला. या संशोधन केंद्राच्या माध्यमातून माझी कोल्हापूरशी नाळ जोडलेली आहे. तसेच या संशोधन केंद्रामुळे संशोधकांना प्रेरणा मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी डॉ. श्रुतीका पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार सुभाष देसाई, सुरेश शिपूरकर यांच्यासह अध्यापक, संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

26 JUL 2018
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खारफुटी संवर्धनाचा वारसा

**२६ जुलै हा जागतिक खारफुटी दिवस म्हणुन जगभरात साजरा होतो. आज खारफुटींची समुद्र किनाऱ्याजवळ आढळणारी हिरवीगार जंगले बेचिराख होताना दिसत आहेत. त्यांच्या संवर्धनासाठी केलेल्या प्रयत्नातून वनस्पतींना वाचविण्यासाठी, याबाबत जनजागृती करून संरक्षण, संवर्धनाची चळवळ पुढे चालू ठेवण्याचा हा प्रयत्न.**



▸▸ प्रा. डॉ. निरंजना चव्हाण
वनस्पतीशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ

## जागतिक खारफुटी दिन

जिथे समुद्राला नदी मिळते या ठिकाणी समुद्र व नदीपेक्षा वेगळ्या प्रकारच्या परिसंस्थेची निर्मिती होते. या प्रदेशाला किंवा परिसंस्थेला 'खाजण परिसंस्था' असे संबोधले जाते. खाजण भाग म्हणजेच समुद्राच्या लाटांच्या भरतीच्या प्रभावा खालील क्षेत्र. या खाड्यांमधील किंवा खाजणांमध्ये वाढणाऱ्या वनस्पतींना 'खारफुटी जंगले' 'खारफुटी वनस्पती, 'खाजण वने', कांदळ वने असे संबोधले जाते. पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून पाहिलं असता ही जंगले अनेक पवित्र कामे करत असतात. म्हणून यांना मराठीत 'मंगलवने' संबोधले जाते.

भारतातील खाजण परिसंस्थेवर अनेक अंगानी संशोधनाचे काम फार पूर्वीपासून सुरू आहे. शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागात प्रा. डॉ. जी. व्ही. जोशी यांनी या संशोधनाचा पाया घातला. याचा सर्वांगांनी विस्तार या विभागात करण्याचे श्रेय प्रा. डॉ. लिला भोसले यांना जाते. त्याचा पुढचा भाग वनस्पतींचा वेगवेगळ्या अंगाने अभ्यास, संशोधनाचे व संवर्धनाचे काम आज वनस्पतीशास्त्र अधिविभागामध्ये सुरू आहे. खारफुटी वनस्पतींच्या जैवविविधतेचा महाराष्ट्रासाठी विचार केला तर असे लक्षात येते की यांची जैवविविधता ही सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वात जास्त आहे. भेलांडा, इरापू व सुंदरी या वनस्पती भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील खाड्यांमध्ये फक्त काही ठिकाणीच आढळतात. आचऱ्याची खाडी हा खारफुटींच्या जैवविविधतेचा संवेदनशील प्रदेश आहे. ही विविधता टिकवण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न सुरू आहेत. भारताच्या पूर्व व पश्चिम किनारपट्ट्यावर मिळून ६०पेक्षा जास्त खाजण वनस्पतींचे प्रकार आढळतात. यातील जवळजवळ २७ प्रकारच्या वनस्पती पश्चिम किनाऱ्यावर सापडतात.

जागतिक स्तरावर वनस्पतींच्या सर्वेक्षणाचे काम नेहमीच सुरू असते. यातुन वनस्पतींचे वर्गीकरण केले जाते. पश्चिम किनारपट्टीवर भेलांडा, इरापू , सुंदरी या अतिशय दुर्मिळ व नष्ट होणाऱ्या मार्गावर आहेत. या वनस्पतींना ताबडतोब संरक्षणाची गरज आहे. खारफुटी वनस्पती व खाजण परिसंस्था या नुसत्या परिस्थितीकीय दृष्टिकोनातूनच नाही तर सामाजिक व आर्थिकदृष्ट्यासुध्दा महत्वाच्या आहेत. म्हणूनच त्यांना समुद्र किनाऱ्याची जीवनरेखा म्हणतात.

निसर्गाचे सर्वात मोठे देणे म्हणजेच खाडी व समुद्रकिनाऱ्यावरील मासेमारीसाठीची ही अन्न साखळी ! खारफुटी वनस्पतींची पाने, फुले, फांद्या, फळे इ. जमिनीवर पडून अन्नसाखळीला सुरवात होते. या पडलेल्या भागांवर वनस्पतींच्या अवशेषांवर खेकडे व इतर प्राणी जगतात. या वनस्पतींचे तुकडे खेकडे व इतर प्राण्यांमुळे कुजण्याची प्रक्रिया सुरू होते. नंतर किटक, अळ्या या छोट्या तुकड्यावर जगतात. त्यातून बाहेर येणाऱ्या अन्नपदार्थांवर बुरशी, प्राणी व प्लवके वाढतात. त्यावर छोटे मासे, छोट्या माशांवर मोठे मासे अवलंबून असतात. महत्वाचे म्हणजे खारफुटी जेवढ्या जास्त, तेवढ्या मोठ्या प्रमाणात माशांची पैदास होते. खाजण परिसंस्थांना म्हणूनच 'माशांची जन्म स्थळे' असे म्हटले जाते. म्हणूनच खारफुटींची तोड जेव्हा मोठ्या प्रमाणात होते, तेव्हा माशांचे अन्न कमी तयार होते. त्यामुळे किनार पट्ट्यांवरील मत्स्योत्पादनामध्ये घट होते.

त्यामुळे वनस्पतीशास्त्र विभागामध्ये संरक्षण, संवर्धनाचे काम सध्या सुरू असून अशा २० प्रजातींचे इथे संवर्धन केलेले आहे. यांचे एक तंत्रज्ञान खाऱ्या पाण्यातून गोड्या पाण्यात त्यांना उभे केले आहे हे होय. चला तर मग मंगलवनांना वाचवुया, किनारपट्ट्या सुरक्षित करूया. २००८ पासून वनस्पतीशास्त्र विभागामध्ये हा दिवस साजरा केला जातो. एम. एस्सी.च्या मुलांसाठी अभ्यासासाठी वनस्पतींचे प्रदर्शन भरवले जाते.




**कोल्हापूर : ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. आर. व्ही. भोसले यांच्या 'स्मृतितरंग' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अरुण नरके, शिवाजीराव पवार, प्रा. डॉ. पी. एस. पाटील, विजया भोसले, पी. टी. पाटील. (छाया : पप्पू आत्तार)**

# डॉ. आर. व्ही. भोसले यांच्यामुळेच इस्त्रो, विद्यापीठातील नाते घट्ट

## प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

इस्त्रो आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यातील नाते अधिक घट्ट करण्याचे काम ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. आर. व्ही. भोसले यांनी केले. त्यांच्या योगदानामुळे विद्यापीठाचे पन्हाळ्यातील अवकाश संशोधन केंद्र उभे राहिले, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. आर. व्ही. भोसले यांच्या 'स्मृतितरंग' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. भोसले यांनी निवृत्तीनंतरही संशोधन कार्य सुरू ठेवले. त्यांच्या संशोधन कार्यातून तरुण पिढीने प्रेरणा घेतली पाहिजे. डॉ. आर. व्ही. भोसले म्हणाले, लहानपणापासून कोल्हापूरच्या मातीची ओढ राहिली. पन्हाळ्यातील अवकाश संशोधन केंद्राचे स्वप्न सत्यात उतरल्याचे मोठे समाधान आहे.

प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. स्मृतिका पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. पी. टी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी गोकुळ संघाचे ज्येष्ठ संचालक अरुण नरके, मराठी विज्ञान परिषदेचे शिवाजीराव पवार, विजया भोसले आदी उपस्थित होते.

# ज्ञानकेंद्राच्या माध्यमातून ग्रंथपालांनी समाजाचे दिग्दर्शन करावे : डॉ. जांगे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ज्ञानस्रोत केंद्राच्या माध्यमातून ग्रंथपालांनी समाजाचे दिग्दर्शन करावे, असे आवाहन गुलबर्गा विद्यापीठाचे प्रभारी ग्रंथपाल डॉ. सुरेश जांगे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाच्या ५५ व्या स्थापना दिवसानिमित्त ग्रंथालय आणि इन्फ्लीबनेट सेंटरच्या वतीने आबालाल रेहमान आर्ट गॅलरीमध्ये 'इन्स्टीट्युशनल रिपॉजेटरी डिस्पेस व सोल-ग्रंथालय संगणकीकरण' या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. उद्घाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के यांच्या हस्ते झाले.

डॉ. जांगे म्हणाले, सध्याच्या काळातील बदलत्या माहिती व तंत्रज्ञानाचा योग्य वापर महाविद्यालये व विद्यापीठातील ग्रंथालयांनी चांगले बदल घडविण्यासाठी स्वीकारणे आवश्यक आहे. या माध्यमातून वापरकर्त्याला माहिती सेवा देण्यासाठी ग्रंथालयांनी प्रयत्न केले पाहिजेत.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांनी ग्रंथालयाशी निगडित असलेले हे सॉफ्टवेअर हाताळल्यास विद्यापीठ व महाविद्यालयांमधील ग्रंथालयांमध्ये एकसारखेपणा निर्माण होईल.

तत्पूर्वी, शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. सुमित्रा जाधव, डॉ. एच.एम. वायदंडे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. शालिनी लिहितकर यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठ ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी परिचय तर अलमास पेंढारी व भाग्यश्री गुरव यांनी सूत्रसंचालन केले. आभार डॉ. पी. बी. बिलावर यांनी मानले.

यावेळी स्वप्निल पटेल, विजयकुमार श्रीमाळी यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्रासह गुजरात, कर्नाटक, गोवा आदी राज्यांतून ६० हून अधिक प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

# मत्सबीज व मत्सखाद्याच्या व्यवसायात मोठ्या संधी

## डॉ. एस. जे. मेश्राम; शोभिवंत मासे कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतात शोभिवंत माशांच्या व्यवसायाकडे अजूनही दुर्लक्ष केले जात आहे. जगभरात हा व्यवसाय वाढत आहे. यामध्ये शोभिवंत माशांचे मत्सबीज व मत्सखाद्याच्या क्षेत्रात मोठ्या संधी असल्याची माहिती कॉलेज ऑफ फिशरीजचे डॉ. एस. जे. मेश्राम यांनी येथे दिली. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभाग आणि रत्नागिरी येथील कॉलेज ऑफ फिशरीजच्या वतीने आयोजित 'शोभिवंत रंगीबेरंगी माशांचे बिजोत्पादन आणि संगोपन' या विषयावरील प्रशिक्षण कार्यशाळेत डॉ. मेश्राम बोलत होते. डॉ. मेश्राम म्हणाले, जागतिक स्तरावर शोभिवंत मासे हा करिअरचा विषय बनला आहे. पण आपल्याकडे याबाबत जनजागृतीची गरज आहे.

डॉ. बी. आर. चव्हाण म्हणाले, अमेरिका आणि जपान या देशातील प्रत्येक घरात माशांची पेटी आहे. भारतात हा व्यवसाय वाढण्यासाठी संधी आहेत. यावेळी विद्यार्थ्यांना काचेची पेटी बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.



कोल्हापूर : 'स्मृतितरंग' पुस्तक प्रकाशन सोहळ्याप्रसंगी डावीकडून अरुण नरके, शिवाजी पवार, पी. एस. पाटील, डी. टी. शिर्के, आर. व्ही. भोसले, विजया भोसले, पी. टी. पाटील.

# अवकाश संशोधन वाटचालीत भोसले सरांचे बहुमोल मार्गदर्शन

## प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठामार्फत चालवण्यात येणाऱ्या पन्हाळा अवकाश संशोधन केंद्राच्या संशोधक वाटचालीमध्ये आर. व्ही. भोसले सरांचे मार्गदर्शन कायमच लाभत आहे. याचा फायदा युवा खगोल शास्त्रज्ञांना होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के यांनी केले. ते 'स्मृतितरंग' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात बोलत होते.

ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ आर. व्ही. भोसले लिखित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मंगळवारी जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटी हॉल येथे पार पडला. अध्यक्षस्थानी डी. टी. शिर्के होते, तर प्रमुख उपस्थिती डॉ. पी. एस. पाटील, गोकुळ संचालक अरुण नरके, मराठी विज्ञान परिषदेचे शिवाजी पवार, विजया भोसले यांची होती. स्वागत श्रुतिका पाटील यांनी केले. पुस्तकाचे शब्दांकन पी. टी. पाटील यांनी केले.

शिर्के म्हणाले, भोसले सरांची सडेतोड भूमिका आणि गोष्टीचा पाठपुरावा या गुणांमुळे ते कायमच प्रभावी ठरले आहेत. त्यांच्यामुळेच इस्त्रो आणि शिवाजी विद्यापीठाचे नाते दृढ राहिले आहे. त्यांच्या चिकित्सक संशोधनाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ तरुण पिढीला कायमच लाभेल. पी. एस. पाटील म्हणाले, पन्हाळ्यावरील अवकाश संशोधन केंद्र हे सरांचे स्वप्न होते. त्याचा पाठपुरावा करून ते त्यांनी सत्यात उतरवले. त्यांच्या संशोधनाचा फायदा युवा पिढीला मोठ्या प्रमाणावर झाला. त्यांनी आगामी काळात मार्गदर्शनपर पुस्तक लिहावे. दरम्यान, शिवाजी भोसले यांचा वयाच्या ९० व्या वर्षीही उत्साह कौतुकास्पद आहे.

### पद्मविभूषण मिळवण्यासाठी पाठपुरावा करा : अरुण नरके

गोकुळचे संचालक अरुण नरके यांनी भोसले सरांना पद्मविभूषणसारखा सन्मान मिळावा, यासाठी शिवाजी विद्यापीठासारख्या संस्थेने व संशोधक मंडळींनी पाठपुरावा करावा, असे आवाहन केले.

सकाळ

# भोसलेंमुळे विद्यापीठास आकाशाची उंची

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन, स्मृतितरंग या पुस्तकाचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : 'डॉ. आर. व्ही. भोसले हे खगोलशास्त्रज्ञ आहेत. त्यांनी विद्यापीठात अवकाश संशोधन अभ्यासक्रम सुरू केला. एका अर्थाने त्यांनी विद्यापीठाला आकाशी उंची प्राप्त करून दिली. पन्हाळा येथे आकाश निरीक्षण केंद्र सुरू करण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्यामुळेच विद्यापीठाचे इस्रोसारख्या संस्थेशी नाते निर्माण झाले,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. आर. व्ही. भोसले यांच्यावरील स्मृतितरंग या चरित्रात्मक ग्रंथाचे प्रकाशन आज येथील महालक्ष्मी सांस्कृतिक हॉलमध्ये करण्यात आले. या वेळी ते बोलत होते. सूत्रसंचालन पंडित कंदले यांनी केले. पुस्तकाचे लेखक पी. टी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठाच्या नॅनो सायन्स विभागाचे डीन डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ''अहमदाबादला संशोधन पेपर सादर करण्यासाठी गेलो होतो. तेथील राष्ट्रीय पातळीवरच्या त्या प्रयोगशाळेमध्ये डॉ. भोसले वरिष्ठ संशोधक म्हणून कार्यरत होते. त्यांचे काम, स्वभाव पाहून मी प्रभावित झालो. त्या वेळीच मी संशोधक व्हायचे ठरवले होते.'' अरुण नरके, शिवाजी पवार यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. शिर्के म्हणाले, ''डॉ. भोसले यांच्या जीवनात निवृत्ती नाही, कारण ते आजही कार्यरत आहेत. त्यांनी निवृत्तीनंतर कोल्हापुरात येण्याचा निर्णय घेऊन, या मातीशी जोडलेली नाळ कायम ठेवली. त्यांनी विद्यापीठात अवकाश संशोधन अभ्यासक्रमाची सुरवात केली.

पन्हाळा येथे अवकाश निरीक्षण केंद्र सुरू करण्यातही भोसले यांचे योगदान मोठे आहे; पण अद्याप ते केंद्र सुरू झाले नसल्याची खंतही आम्हाला आहे.'' विजयाताई भोसले, डॉ. जयसिंगराव पवार, अनिल चौगुले उपस्थित होते.



**कोल्हापूर : स्मृतितरंग या पुस्तकाचे प्रकाशन करताना (डावीकडून) अरुण नरके, शिवाजी पवार, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. व्ही. भोसले, विजयाताई भोसले व पी. टी. पाटील.**

### डॉ. भोसले यांना 'पद्मश्री' द्या

**या वेळी अरुण नरके म्हणाले, ''डॉ. भोसले यांचे संशोधन आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहे. त्यामुळे त्यांना पद्मश्री पुरस्कार मिळाला पाहिजे; यासाठी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा.''**